ITU मार्गदर्शक तत्त्वे

कोविड-19 दरम्यान, दिव्यांग व्यक्तींच्या समावेशासह सर्व लोकांना डिजिटल माहिती, सेवा व उत्पादने कशी सुसाध्य होतील याची खात्री करण्याविषयी[i]

जग अशा अभूतपूर्व अनुभवातून जात आहे की लोकांसाठी, एकमेकांशी संवाद-संपर्क करण्याचे बहुधा एकमेव शक्य असलेले साधन म्हणजे ICTs (माहिती आणि संपर्क तंत्रज्ञाने) आहे. महत्त्वपूर्ण माहिती किंवा अत्यावश्यक सेवा आणि जगण्यासाठी लागणारी उत्पादने हे मिळण्यासाठी अशा डिजिटल स्थितीवर मानव यापूर्वी कधीच अवलंबून नव्हता. म्हणून लिंग, क्षमता, वय किंवा ठिकाण काहीही असले तरी, सर्वच लोकांसाठी कोविड-19 उद्रेक कालावधीदरम्यान माहिती व सूचना प्राप्त करण्याचे महत्त्व निर्णायक स्वरूपाचे आहे.

ह्या कारणासाठी, सुसाध्य अशा स्वरूपणांमधून[1] कोविड-19 वरील महत्त्वाची डिजिटल माहिती वितरित होणे व उपलब्ध असणे आवश्यक आहे, त्यामुळे ती सर्व लोकांपर्यंत पोहोचण्याची खात्री होईल आणि कोणीही मागे पडणार नाही. या लोकांमध्ये दिव्यांग व्यक्तींचाही समावेश असेल, विशेषतः ज्यांना दृष्टीचा किंवा श्रवणाचा दोष आहे आणि त्या कारणाने त्यांना स्क्रीन रीडर्स, कॅप्शनिंग किंवा साईन लँग्वेज यासारख्या पर्यायी सोल्यूशन्सचा वापर डिजिटल माहिती वाचण्यासाठी व समजून घेण्यासाठी करावा लागतो. अन्यथा, ह्या उद्रेकाच्या कालावधीत, ज्या पावलांचा विचार व आदर करायला हवा त्याबाबतची माहिती सुसाध्य होत नसल्याच्या कारणाने, दिव्यांगत्व असणाऱ्या अनेक लोकांना प्रदूषणाच्या उच्च जोखमीला सामोरे जावे लागेल.

म्हणून, साध्या भाषेत, वाचायला सोप्या पद्धतीची आणि सुसाध्य स्वरूपणांमध्ये माहिती देण्याच्या जोडीला, सहज पाहता येण्याजोगी संकेतस्थळे (वेबसाईटस्), दूरध्वनी, रेडिओ, व्हिडिओज, पानपूरके, कॅप्शनिंग, चॅट, इ. यासारखी संपर्काची बहुविध साधने वापरणे निर्णायकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. या जागतिक उद्रेकाचा प्रसार व परिणाम कमी करण्यासाठी निष्ठापूर्वक काम करणाऱ्या हेल्पलाईन्सची उपलब्धता आणि जागृती अत्यावश्यक आहे आणि या हेल्पलाईन्सचे ध्येय हे सार्वजनिक आरोग्य माहिती सहजप्राप्य (ॲक्सेसिबल). (बधीर आणि फार कमी ऐकू येणाऱ्या लोकांसाठी रिले सेवेच्या समावेशासह) ठेवण्याचे असले पाहिजे.

---

[1] प्रवेश करण्यायोग्य डिजिटल सामग्री कशी विकसित करावी आणि रीडीमेट कशी करावी याविषयी ITU ट्युटोरिअल्स

ITU- D ICT ॲक्सेसिबलिटी मधील स्व-गतीने ऑनलाईन मोफत प्रशिक्षण पाठ्यक्रम पुढील लिंक्सवर:

- *ICT ॲक्सेसिबलिटी – समावेशक संप्रेषणासाठी महत्त्वपूर्ण*
- *वेब ॲक्सेसिबलिटी – समावेशक डिजिटल समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य*

अनेक दिव्यांग व्यक्ती, त्यांच्या क्षेम-कल्याणाचे आवश्यक जिन्नस जसे की औषधे, आरोग्य-संबंधित उत्पादने, खाद्य वस्तू हे नियमितपणे घरी मिळण्यावर (होम डिलीव्हरी) विसंबून असतात. म्हणून, सोशल डिस्टन्सिंग व पुरवठा जाळे हे कोलमडून पडण्याच्या संभाव्य विपरीत परिणामांच्या जोडीला, जर त्यांची ऑनलाईन माहिती, सेवा आणि उत्पादने यांची माहिती सहजपणे मिळण्याची खात्री किरकोळ विक्रेते, आरोग्य संगोपन उत्पादने व सेवा यांचे प्रदाते आणि इतर महत्त्वाच्या संघटना यांनी केली नाही तर, महत्त्वपूर्ण माहिती, औषधे व इतर निर्णायक सेवा-उत्पादने यांच्या अभावामुळे, अनेक दिव्यांग व्यक्तींचा नुसताच तोटा होणार नाही तर त्यांचे जीवनही जोखमींवरच येऊन ठेपेल.

जागतिक कोविड-19 उद्रेकात ICTज नी बजावायच्या मोठ्या भूमिकेकडे पाहता, महत्त्वाचे संदेश आणि कृती समाविष्ट असलेल्या खालील मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत, त्यानुसार जगभरात पोहचवली गेलेली डिजिटल माहिती, सेवा आणि उत्पादने ही, दिव्यांग व्यक्तींच्या समावेशासह सर्व लोकांना सहजपणे मिळण्याची, आणि ह्या जागतिक आव्हानात्मक पेचप्रसंगात कोणीही मागे राहणार नाही याची खात्री करून घ्यायची आहे.

महत्त्वाचे संदेश आणि कृती

1. **दिव्यांगत्व असलेल्या लोकांच्या समावेशासह सर्व लोकांना ही महत्त्वाची माहिती पाहता येणे शक्य व्हावे यासाठी, कोविड-19 चे प्रदूषण घटत जाण्यावरील महत्त्वाची डिजिटल माहिती, सेवा आणि आवश्यकता ह्या, सुसाध्य स्वरूपणांमध्ये पुरविण्याची खात्री करावी:**

कोविड -19 संबंधित तपशील व माहिती सुसाध्य स्वरूपणांमध्ये पुरविले जावेत, जेणेकरून दिव्यांग व्यक्तींच्या समावेशासह प्रत्येकाला त्याची जाणीव झाली पाहिजे. उदाहरणार्थ सार्वजनिक टेलिव्हिजन जाहिराती, ऑनलाईन व्हिडिओज आणि फक्त ऐकू शकता येणारे वेबकास्टस् यामध्ये सबटायटल्स किंवा साईन लँग्वेज स्पष्टीकरण असल्याखेरीज, बहिऱ्या लोकांना त्यांचा काहीच उपयोग होणार नाही. इतर कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत असते त्याप्रमाणे, पारंपारिक माध्यमांच्या (टीव्ही व रेडिओ) खेरीज, ICTच्या जगात विविध तंत्र-युक्त्या (मेकॅनिझम्स) समाविष्ट आहेत ज्या अशा अ-साधारण परिस्थितींमध्ये दिव्यांगत्व असलेल्या लोकांसाठी संपर्क-वहन (कम्युनिकेशन) सुलभ करू शकतात: लँडलाईन्स, मोबाईल ऑडिओ, SMS/मंजकुराचे संदेश आणि इंटरनेट-आधारित सेवा व सामग्री जसे की संकेतस्थळे (websites), व्हिडिओ, इन्स्टंट मेसेजिंग ॲप्स, व्हॉईस सर्व्हिसेस ऑन इंटरनेट प्रोटोकॉल (IP), वेब कॉन्फरन्सिंग सोशल मिडीया नेटवर्कस्, ज्यात तात्काळ कम्युनिकेशन आणि डिजिटल मजकुराचे (प्रतिमा, व्हिडिओज आणि दस्तऐवज यांचे) आदानप्रदान घडवता येते व सॅटेलाईटमार्फत संपर्क.

2. **दिव्यांग व्यक्तींच्या समावेशासह सर्व लोकांना डिजिटल माहिती आणि सेवा ह्या, पाहता, समजता आणि वापरता येणे शक्य व्हावे याची खात्री करण्यास खालील बाजू विचारात घेतल्याच पाहिजेत:**

a. ज्यांच्याकडे वैयक्तिक ICT साधने[2] नसू शकतात अशा लोकांपर्यंत ऑडिओ व व्हिज्युअल स्वरूपणांमधील **सार्वजनिक माहिती** ही सार्वजनिक जागांवरील म्हणजे रेल्वे फलाट, किरकोळ विक्री दुकाने, उद्याने आणि इतर सार्वजनिक जागा येथील इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले स्क्रीनद्वारे पोहोचू शकते. शक्य असेल तेव्हा मजकुराच्या जोडीने चित्रे-आकृत्या आणि प्रतिमा दाखवल्या पाहिजेत. धोक्याचे[3] स्वरूप व पातळी दर्शविण्यासाठी आणीबाणीच्या स्थितीत वापरले जाणारे ध्वनी इशारे आणि/किंवा सायरन यांच्यासोबत उघडझाप करणारे दिवे असलेच पाहिजेत. लोकांना उद्देशून पब्लिक ॲड्रेस यंत्रणेवरून दिली जाणारी माहिती व सूचना ह्या दृष्य डिजिटल पर्यायाद्वारे(alternatives)[4] पुरवल्या गेल्याच पाहिजेत.

b. जे लोक बधीर आहेत किंवा ज्यांना फार कमी ऐकू येते त्या लोकांना उपयोग करणे शक्य व्हावे यासाठी उपसाधने (अटॅचमेंटस्) किंवा विशेष फीचर्स लावून **रेडिओ**चा वापर करता येऊ शकतो. उदाहरणार्थ, उपकरणे जी प्रक्षेपणाचे प्रसारण कंपनांद्वारे (व्हायब्रेशन्स), उघडझाप करणाऱ्या दिव्यांद्वारे आणि साध्या मजकुराद्वारे करू शकतात आणि कोविड -19 निर्बंध आणि किंवा प्रदूषणाला आळा घालण्यासाठी सरकारने जारी केलेले उपाय याबद्दल बधीर किंवा फार कमी ऐकू येणाऱ्या लोकांना सावध केले जाऊ शकते. ऑनलाईन रेडिओ लाईव्ह किंवा पॉडकास्टमध्ये लिहून काढलेल्या मजकुराचा[5] समावेश हवा.

c. **टेलिव्हिजन:** ऐकण्यात दोष असलेल्या किंवा भाषा समजण्यात अडचण असू शकेल अशा लोकांना कोविड -19 शी संबंधित ऑडिओ समालोचन पाहता येण्यासाठी स्थानिक भाषेतील क्लोज्ड कॅप्शन /सबटायटलिंग पुरविलेच पाहिजे. त्याच्या जोडीला, उद्रेकाबाबत परिस्थितीची[6] माहिती टेलिव्हिजनवरून पुरवताना साईन लँग्वेज इंटरप्रिटर्सचा वापर केला पाहिजे.

d. **SMS:** जर माहिती केवळ SMS द्वारेच पाठवली गेली तर, ज्या लोकांना दृष्येतर इनपुटची गरज आहे आणि इतर स्वरूपणात जसे की ऑडिओमध्ये मजकूर रूपांतरीत करणारी हाय-एंड उपकरणे

---

[2] *डिपार्टमेंट फ़र ट्रान्सपोर्ट आणि ट्रान्सपोर्ट स्कॉटलंड. ॲक्सेसिबल रेल्वे स्टेशन्ससाठी रचनेची मानके – एक संयुक्त सराव संहिता, पृष्ठ 109, के7.साईन्स – प्रदर्शन स्क्रीन्स.

[3] *यूएस ॲक्सेस बोर्ड. 702 आपात्कालीन अलार्म यंत्रणा

[4] * डिपार्टमेंट फ़र ट्रान्सपोर्ट आणि ट्रान्सपोर्ट स्कॉटलंड. ॲक्सेसिबल रेल्वे स्टेशन्ससाठी रचनेची मानके – एक संयुक्त सराव संहिता, पृष्ठ 115, एल1. अनाउन्समेंटस – सामान्य.

[5]*नॅशनल कौंसिल ऑन डिसॲबिलीटी ॲट "दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी परिणामकारक संप्रेषणे: आपात्कालीन पूर्व, दरम्यान आणि नंतर". पान 45: ॲक्सेसिबिलीटी सोल्यूशन्स; पान 104: तालिका 9. मेथडस् ऑफ रिसिव्हिंग अँड व्हेरिफाईंग ॲलर्ट; पान 148: इमर्जिंग प्रॅक्टीस: कॅप्शन्ड रेडिओ

[6] * नॅशनल कौंसिल ऑन डिसॲबिलीटी. "दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी परिणामकारक संप्रेषणे: आपात्कालीन पूर्व, दरम्यान आणि नंतर". पान 45: ॲक्सेसिबिलीटी सोल्यूशन्स; पान 104: तालिका 9. मेथडस् ऑफ रिसिव्हिंग अँड व्हेरिफाईंग ॲलर्ट;

त्यांच्याजवळ नसतील तर त्यांना वगळल्यासारखे होईल. म्हणून, कोविड -19 शी संबंधित आणि उद्रेकाशी संबंधित उपायांचे इशारे व सावधगिरीच्या सूचना ह्या सुद्धा वेगवेगळ्या प्रसारण वाहिन्यांतून अनेकविध स्वरूपणातून जायला हव्यात. संदेशांना जोडलेल्या सर्व प्रतिमांमध्ये पर्यायी वर्णनांचा समावेश असलाच पाहिजे.

e. **WhatsApp** हे सुगम (ॲक्सेसिबल) आहे आणि टॉकबॅक व व्हॉईसओव्हर यांच्यासह काम करते. सिरी (Siri) कडून WhatsApp संदेश मोठ्याने वाचले जातात आणि नवनव्या फोनवर व सीरीमार्फत संदेश वाचून दाखवण्यासाठी हुकूम (डिक्टेट) सुद्धा केला जाऊ शकतो. WhatsApp चा वापर करीत असताना इमोजीजचा वापर करणे टाळा.

f. कोविड -19 बाबतचे **ई-मेल** संदेश विविध भाषांमधून येतील असे केले पाहिजे (एनेबल). सॉफ्टवेअरची रचना ॲक्सेसिबिलीटी मार्गदर्शक सूचनांनुसार अशी केली पाहिजे की ते वेगवेगळ्या उपकरणांवर सुरळीतपणे प्रचालित होईल व वापरकर्त्याच्या साहाय्यक तंत्रज्ञानाला पूरक होईल. काही डेस्कटॉप ॲलर्टिंग यंत्रणा याची खात्री करू शकतील की एकदम पुढे येणारे (पॉप-अप) संदेश मजकुराच्या व बीप आवाजाच्या जोडीला वेगवेगळ्या स्वरूपणात पोहोचवले जावेत. ज्यांना मजकूर समजून घेण्यात अडचणी येतात त्या लोकांना कोविड -19 शी संबंधित ॲलर्टमध्ये चित्रे-आकृत्या आल्यास मदत होऊ शकेल. सर्व प्रतिमांमध्ये पर्यायी वर्णनांचा[7] समावेश असलाच पाहिजे.

g. **सोशल नेटवर्कस्:** सर्वाधिक लोकप्रिय सोशल मिडीया नेटवर्कस् च्या नव्या आवृत्या चढत्या क्रमाने ॲक्सेसिबल बनत आहेत. याचा अर्थ फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्वीटर, यूट्यूब हे ॲक्सेसिबिलीटी वैशिष्ट्ये देऊ करीत आहेत. हे महत्त्वाचे आहे की कोविड -19 शी संबंधित आणि उद्रेक-संबंधित उपायांची महत्त्वाची माहिती या व्यासपीठांवर प्रसिद्ध करणाऱ्या वैद्यकीय आणि माहिती यंत्रणांना, सर्वांपर्यंत संदेश ॲक्सेसिबल आहेत याची खात्री होण्यासाठी डिजिटल मजकूर ॲक्सेसिबिलीटी लागते याची माहिती आहे.[8]

h. **संकेतस्थळावर** सामाईक केलेली महत्त्वाची माहिती मिळवण्यात दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना अडथळे येत नाहीत याची खात्री होण्यासाठी म्हणून, जागतिक /प्रादेशिक किंवा राष्ट्रीय प्रदूषण घटवण्यास कोविड-19 आणि संबंधित माहिती देणाऱ्या संकेतस्थळांची ॲक्सेसिबिलीटी[9]साठी आधी चाचणी झालेली असलीच पाहिजे. सर्व संबंधित डिजिटल दस्तऐवज (वर्ड, पीडीएफ), जे

---

[7] *मायक्रोसॉफ्ट: आपली आऊटलुक ईमेल दिव्यांग व्यक्तींसाठी उपलब्ध करा

[8]*UK सरकार डिजिटल सेवा. सोशल मिडिया प्लेबुक -उपलब्धता

[9] * वेब कंटेन्ट ॲक्सेसिबलिटी सुनिश्चित करण्यासाठी मानक WCAG 2.1

[10] *W3C वेब ॲक्सेसिबलिटी उपक्रम ट्युटोरिअल्स

संकेतस्थळाद्वारे पुरविले जातात ते जर मोठ्याने वाचणे शक्य नसलेल्या स्वरूपणातले असतील, जसे की JPEG फायली किंवा इनॲक्सेसिबल प्रतिमा-आधारित PDFs (म्हणजे स्कॅन केलेल्या प्रतिमा) तर त्या स्क्रीन-रीडर्स वापरणाऱ्या व्यक्तींसाठी ॲक्सेसिबल/न वापरता येण्याजोग्या असू शकतील.

तर दुसऱ्या बाजूला, जाणीवेचे दिव्यांगत्व असलेले लोक, किंवा भाषिक फरक असलेले लोक यांच्यासाठी प्रतिमा आणि चित्रे-आकृत्या हे मजकूर मांडण्याचे अत्युत्तम मार्ग आहेत; तथापि, त्याला माहितीच्या मजकुराची पूरक जोड असलीच पाहिजे. म्हणजे डोळ्यात बिघाड असणाऱ्या आणि ध्वनी किंवा ब्रेल डिस्प्ले आऊटपुट स्क्रीन रीडींग सॉफ्टवेअर वापरणाऱ्या व्यक्तींना माहिती प्राप्त करणे व समजणे शक्य होण्याची खात्री होईल. बाह्य संकेतस्थळांच्या लिंक्स वर्णनपर असल्या पाहिजेत. ज्या व्यक्ती माऊस वापरत नाहीत त्यांच्यासाठी संकेतस्थळाचा प्रत्येक मूळ भाग कीबोर्डद्वारे ॲक्सेसिबल असला पाहिजे.[10]

अतिरिक्त ITU साधनसामग्री आणि विशिष्ट गरजा असणाऱ्या व्यक्तींच्या डिजिटल समावेशाला आधार देण्यासाठीची माहिती यासाठी कृपया येथे पाहा: विशिष्ट गरजा असलेल्या व्यक्तींसाठी ICT ॲक्सेसिबलिटी आणि ITU-D डिजिटल समावेश

---

[i] ***ह्या मार्गदर्शक सूचना सर्वांगीण नाहीत***

भाषांतर डिसक्लेमर: *"हाऊ टू एन्शुअर दॅट डिजिटल इन्फर्मेशन, सर्व्हिसेस अँड प्रॉडक्टस् आर ॲक्सेसिबल बाय ऑल पीपल, इनक्लुडिंग पर्सन्स विथ डिसॲबिलीटीज ड्यूरिंग कोविड -19"* यावरील ITU च्या लघु मार्गदर्शक सूचनांचे अचूक भाषांतर 6 यूएन भाषा: इंग्रजी , अरेबिक , चिनी , फ्रेंच , रशियन, स्पॅनिश , वगळता इतर भाषांमध्ये पुरवण्यासाठी रास्त प्रयत्न केले गेले आहेत पण मजकुरात, काही विशिष्ट तांत्रिक भाषा असल्यामुळे थोडेफार फरक घडणे शक्य आहे. भाषांतरीत माहितीतील कोणत्याही चुका, वगळलेला भाग, मजकुराच्या अचूकतेबाबत संदिग्धता, किंवा त्याची विश्वसनीयता याबाबत कोणतीही जबाबदारी घेतलेली नाही. तफावत असण्याच्या स्थितीत, इंग्रजी मूळ आवृत्ती प्रमाण धरली जाईल.

*** ITU संसाधन नाही:** *ह्या साईटवर दिलेली सर्व माहिती चांगल्या भावनेने दिलेली आहे, तथापि ह्या बाह्य साईटस् द्वारे पुरविलेल्या माहितीचे आम्ही कोणतेही प्रतिनिधित्व, प्रमोशन, किंवा अचूकता, पुरेपूरता, वैधता, विश्वसनीयता, उपलब्धता किंवा माहितीची संपूर्णता (कम्प्लीटनेस) याची कोणत्याही प्रकारची उघड असो किंवा गर्भित वॉरंटी देत नाही.*